# मुंबईतील ग्राहकांसाठी हरित ऊर्जा

**मुंबई (प्रतिनिधी):**

अदाणी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) मुंबईच्या हरित ऊर्जा परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सर्व ग्राहकांना अपारंपरिक ऊर्जेसाठी त्यांचे लक्ष्य ठरवण्याचे स्वातंत्र्य एईएमएल सादर करत असलेल्या मुंबई हरित ऊर्जा उपक्रमामुळे (ग्रीन एनर्जी इनिशिएटिव्ह) मिळणार आहे. एईएमएल शाश्वत विकासासाठी कटिबद्ध आहे आणि पॅरिस करारांतर्गत भारताने मान्य

## अदाणी इलेक्ट्रीसिटी कंपनीचा पुढाकार

केलेल्या अपारंपारिक ऊर्जेचे लक्ष्य साध्य करण्यास वचनबद्ध आहे. एईएमएल २०२३ पर्यंत अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून ३० टक्क्यांहून अधिक ऊर्जा आवश्यकतांची पूर्तता करणार आहे. एमईआरसीकडून अगोदरच मान्य करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या माध्यमातून ही क्षमता ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात येणार आहे त्यासाठी १,००० मेगावॅट ऊर्जा खरेदीचा प्रस्ताव एमईआरसी ला सादर करण्यात आला आहे यापैकी ५१ टक्क्याहून अधिक ऊर्जा ही अपारंपरिक ऊर्जा स्रोतांकडून खरेदी करण्यात येणार आहे .